
ISSN No. 2394-9996
Vol- II

# New Vision

Multi-disciplinary
Bi-Annual
Research Journal



## Special Issue for National conference on

## "Impact of Bhakti Movement & Sufism on Society"

30th & 31st August 2016

Anjuman Ishat -e- Taleem Beed's
Milliya Arts, Science & Management Science College,
Beed- 431122 (Maharashtra)
Website : www.milliyasrcollege.org
E-mail.ID : newvisionjournal@gmail.com

Scanned by CamScanner

P 83-

ISSN No.2394-9996

# New Vision

Multi-disciplinary Research Journal
August 2016

**Chief Editor**
**Dr. Mohammed Ilyas Fazil**
Principal, Milliya Arts, Science &
Management Science College, Beed.

**Executive Editor**
**Dr. Mirza Asad Baig Rustum Baig.**

**Managing Editors**
**Dr. Syed Hameed Kareem**
**Prof. Syed Fareed Ahmed Nahri.**
**Dr. Pathan Ayub Majid Khan**

**Published by**
Anjuman Ishat -e- Taleem Beed's
Milliya Arts, Science & Management Science College,
Beed- 431122 (Maharashtra)
Website : www.milliyasrcollege.org
Online version : http://www.milliyaresearchportal.com
E-mail.ID : newvisionjournal@gmail.com

Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४ | भक्ती चळवळीचे सामाजिक कार्य. | प्रा. फेरोज देशमुख. डॉ. वाघ. डी.एन | इतिहास | 48 |
| १५ | भक्ती चळवळीचे सामाजिक व सांस्कृतिक कार्य. | सुर्यवंशी राजेंद्र. एच | इतिहास | 52 |
| १६ | मध्ययुगीन भारतीय इतिहासात वारकरी संप्रदायाचे योगदान. | मूंडे दत्तात्रय | इतिहास | 58 |
| १७ | भक्ती चळवळीतील संत स्त्रीयांचे सामाजिक कार्य. | यास्मीन वहिद शेख | इतिहास | 62 |
| १८ | सुफी के सामाजिक और सांस्कृतिक कार्य. | किवने गीता गोरक्षनाथ | इतिहास | 66 |
| १९ | भक्ती चळवळीचा सामाजावरील पडलेला प्रभाव. | शेळके जगदीश भाऊसाहेब | इतिहास | 71 |
| २० | सूफींचे सामाजिक ऐक्यासाठी कार्य. | सुरेखा विठ्ठलराव जावळे | इतिहास | 78 |
| २१ | समर्थ रामदासांचे मध्ययुगीन समाज जीवना वरील भाष्य. | दिपक बाबूलाल सिरसाट | इतिहास | 83 |
| २२ | मालोजी राजे, शहाजी राजे और छत्रपती शिवाजी के सूफी संतो से संबंध. | डॉ. मिर्झा मोहम्मद ख़िजर | इतिहास | ८७ |
| २३ | सूफी संप्रदाय का सामाजिक एकता में योगदान. | डॉ. शेख एजाज एम. | इतिहास | 94 |
| २४ | सूफीया-ए-औरंगाबाद. | डॉ. शेख कलीम मोहियोद्दीन | इतिहास | 99 |
| २५ | मध्यकालीन भारत में सूफी आंदोलन का प्रभाव चिश्तिया सम्प्रदाय विशेष संदर्भ. | डॉ. शेख शहजहॉन | इतिहास | 106 |
| २६ | सूफी दर्शन - एक अध्ययन. | डॉ. पठाण ए.एम. | हिंदी | 111 |
| २७ | सूफी आंदोलन का सामाजिक सांस्कृतिक योगदान. | प्रा. गायकवाड प्रकाश | हिंदी | 114 |
| २८ | सूफी संत शेख मोहम्मद बाबा. | डॉ.बाबासाहेब केशवराव शेप | इतिहास | 118 |

Scanned by CamScanner

New Vision
ISSN No.2394-9996

# समर्थ रामदासांचे मध्ययुगीन समाज जीवनावरील भाष्य....

संशोधक विद्यार्थी
दिपक बाबुलाल शिरसाट
मु.पो. गोंदेगाव ता. जामनेर जि. जळगांव
dsshirsat79@gmail.com

ज्ञानेश्वरांच्या समाधीपूर्वीच इ.स. १२९४ ला उत्तरेकडील मुस्लीम आक्रमणांची एक धाड महाराष्ट्रावर येऊन गेली. त्यानंतर अल्लाउद्दिन खिलजी, मलिक काफुर, मुहम्मद तुघलक यांच्या स्वाऱ्यांमुळे देवगिरीच्या यादवांचे साम्राज्य संपुष्टात आले. आजूबाजूची खेळणे, रायरी, सोनखेड, वारंगळ इ. दक्षिणेतील हिंदु राज्ये नष्ट होऊन ज्ञानेश्वरांच्या पश्चात अवघ्या पाव शतकाच्या अवधीत महाराष्ट्र मुस्लीम सत्तेच्या आधीपत्याखाली गेला. इ.स. १३४७ पासून बहामनी वंशाची राजवट महाराष्ट्रात सुरु झाली. त्याच्या अगोदर १० वर्षे हरीहर बुक्क या कानडी बंधूंनी हिंदू राज्याची स्थापना तुंगभद्रेच्या तीरी विजयनगर येथे केली. विजयनगर व बहामनी या दोन या दोन राज्यांच्या सतत दोनशे वर्षे लढाया सुरु होत्या. त्यांच्यातील आक्रमणाची धामधूम व लागोपाठ पडलेले मोठे दुष्काळ यांमुळे महाराष्ट्रीय जीवन उद्वस्त होऊन गेले. सर्वोत्र तामोयुग पसरले. अशा परिस्थितील पुढील शे-दीडशे वर्षाच्या अवधीत राजकीय वा सांस्कृतिक क्षेत्रात एकही कर्तबगार पुरुष महाराष्ट्रात निर्माण होऊ शकला नाही. धार्मिक क्षेत्रातील जुने पंथ आणि परंपरा कसावसा तग धरून राहिल्या होत्या.१ इ.स. १६०० ते १६९० दरम्यान सामाजिक जीवनाची धुरा तुकाराम व रामदास यांनी धरली. तुकारामांनी वारकरी संप्रदायाची धुरा संपूर्ण महाराष्ट्रात तेवत ठेवली. रामदासांनी देशभ्रमनातून संपूर्ण देशाच्या सामाजिक परिस्थितीचे चित्रण स्वतः अनुभवले त्यातून अस्मानी सुलतानीच्या कचाटयात सापडलेल्या समाज्याला जगण्याचा विश्वास देणे. आणि आत्मोन्नतीचर मार्ग दाखविणे. हे त्यांच्या समर्थ संप्रदायाचे ध्येय होते.२

संत रामदास हे समर्थ संप्रदायाचे उद्गाते होते. वयाच्या ८ व्या वर्षी वडील मृत्यू पावले वयाच्या १३ व्या वर्षी "सावधान" शब्द ऐकताच लग्नमंडपातुन ते निघाले व नाशिक पंचवटी येथे १२ वर्षे त्यांनी काढली. पुढील १२ वर्षात त्यांनी भारत भ्रमंती केली. या देशाटनाच्या प्रवासात त्यांना ज्या समानरचना, चालीरीती, व्यवस्था आढळल्या, त्यावर भ्रमण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी आपल्या लिखाणातून समाजरचनेचे चित्र प्रकर्षित केले. निश्चळ, चंचळ आणि जड अशी तीन तत्वे मिळून जग बनले आहे३. अशा पंचभूतात सृष्टीतील वस्तू ३ तत्वांनी बनलेल्या आहे. मुस्लीम



Scanned by CamScanner

सत्तेने केलेले हिंदुधर्म, संस्कृती आणि स्त्रिया यांवरील आक्रमण पाहून लोकांची आरत्र ना परत्र अशी स्थिती पाहून केवळ त्यांना निवृत्तीवादी विचार सांगणे उपयोगाचे नाही. यासाठी लोकांना प्रवृत्तीचा मार्ग सांगितला पाहिजे. हा मुख्य निश्चय तृयांनी केला अस्मानी सुलतानीच्या कैचीत सापडलेल्या समाज्याला त्यांनी 'धीर्धरा धीर्धरा तकवा । हडबडू गडबडू नका । काळ देखोनी वर्तावे । सांडावे भय पोटीचे ॥ असा उपदेश केला४.

रामदासांनी परधर्मीय सत्तेच्या जुलमाखाली खीतपण पडलेल्या जनतेला तिच्या सुप्त सामर्थ्याची जाणीव करून देण्यासाठी प्रचंड संघटना केली५. एव्हढेच नव्हे तर मुस्लीम आक्रमकांनी केलेल्या स्वाज्याचे स्वरूप इटालियन प्रवासी मनुची, फ्रेंच प्रवासी बर्नियर, इंग्लिश इतिहासकार एल्फिन्स्टन व इतर इतिहासकारांनी स्वतः पाहून व माहिती मिळवून जे वर्णन केले आहे त्या मुख्य त्यांची चार अंगे सांगितली आहे. त्यात धर्मवेडेपणा, लुट, कौर्य, अत्याचार यांचा समावेश होतो६. परंतु रामदासांना हे चित्र वेगळे वाटते. चित्राच्या, दृश्यांचा अनुभवावरून, त्याचे वर्णन त्यांनी 'अखंड चिंतेच्या प्रवाही पडले लोक । दरिद्र्य दुखः उव्दगे । लोक सर्वत्र पीडले । उदंड दुखः लोकांचे एकता । उर फुटतो. ।७ या उद्गारावरून परकीय व परधर्मियांच्या जुलमी अमलाखाली सामन्यांची सत्ता जाउन वेगळी सत्ता उदयास आली. त्यातून सर्वसामान्यांचा स्वधर्माचार किती धोक्यात आला असेल याची प्रत्याक्षस्थिती दिसते. या सर्व स्थितीला बदलविण्यासाठी सर्वसामान्यांचा ह्रदयात स्वदेश, स्वदेव, स्वधर्म यांची जोपासना करणे गरजेचे आहे. याची त्यांना ओळख झाली. सामन्यांच्या ह्रदयात त्यांनी ३ तत्वांची म्हणजेच स्वदेश, स्वधर्म, स्वदेव यांची निर्मिती केली. म्हणून दासबोधात ते म्हणतात. म्लेच्छ दुर्जन उदंड । बहुता दिसांचे माजले बंड । याकारणे अखंड । सावधान असावे ।८ ही सूचना त्यांनी कोणासाठी दिली याची प्रत्यक्ष ओळख, जाणीव त्यांच्या लिखाणातून कळते. यासाठी त्यांनी गावोगावी जाऊन सर्वसामान्यांच्या विशेषतः तरुणांच्या ह्रदयात बालोपासानाचे महत्व जागृत केले. तरुणांना संघटीत व एकत्रित केले. 'चिंता वाहतो विश्वाची' उक्तीचा त्यांनी प्रत्यक्ष जीवनात आचरण व कार्याच्या माध्यमातून वारसा चालवला. २४ व्या वर्षापासून ३६ व्या वर्षापर्यंत केदारनाथपासुन कन्याकुमारीपर्यंत तीर्थयात्रा त्यांनी केली९. त्याचे वर्णन त्यांनी 'न्याय बुडाला बुडाला जाहला शिंजोरी । किती गुज्रिणी ब्राम्हणी भ्रष्टविल्या । किती शामुखी जाहजी फाकविल्या । किती एक देशांतरी त्या विकल्या । किती सुंदरा हाल होऊन मेल्या ॥१० यांवरून समाजामध्ये घडलेल्या अत्याचारांचे, सर्वसामान्य-स्री-पुरुष, अबाल वृद्धांवर झालेल्या अत्याचाराचे वर्णन केलेले दिसते. तात्कालीन समाजामध्ये शेती व प्रमुख व्यवसाय होता. शेती शिवाय जगणे असह्य होते. शेतीतून येणाज्या उत्पन्नावरूनच सर्वसामान्य व्यक्तींचे जीवन अवलंबून होते. परंतु अशा सामन्यांचा शेतमालावरही मोठ्या प्रमाणावर हल्ला होत होता. काढणीला आलेली पिक नष्ट होत होते. त्यांचे वर्णन करतांना रामदास म्हणतात 'किती एक ग्रामेची ओस झाली । पिके सर्व धान्यच नाना बुडाली ।११ यावरून पराक्रमानाची झळ

शेतकऱ्यांना भोगावी लागत होती. तर त्यांच्या मिळकतीच्या उत्पन्नाला सोसावी लागत होती. शेतीतील येणारे पिक नष्ट झाल्यामुळे संपूर्ण शेतकरी कर्जबाजारी होत होता. याचा परिणाम संपूर्ण समाजाच्या जीवनावर व अर्थव्यवस्थेवर होत होता.

रामदासांनी केलेल्या देशभ्रमंतीनंतर त्यांना आलेले अनुभव, त्यांनी लिखाणाच्या माध्यमातून सामान्य जनतेसमोर ठेवले. दासबोध ग्रंथाच्या माध्यमातून त्यांनी तत्कालीन समाजाला आलेली ग्लानी, ग्लानी दूर करण्यासाठी आवश्यक लक्षणे, आचरण, स्वधर्म, स्वदेश, वैराग्य, ज्ञान, सामर्थ्य यांसारखी लक्षणे सर्वसामान्य जनतेसमोर ठेवले. दासबोधात २० दशक, २०० समास होत.१२ या लिखाणातून त्यांनी अज्ञानी-पुरुषापासून, उत्तमपुरुष कसा असावा ही सर्व लक्षणे सांगितली आहे. त्यांच्या लिखाणात सकस, उत्कट, ओजस्वी आणि भेदक वैशिष्टे दिसते.१३

रामदासांनी केलेल्या आपल्या लिखाणात मानवी स्वभाव, अर्थकारण, धर्मकारण, राजकारण, या सारख्या व यापेक्षा अनेक विषयांचे दर्शन रामदासांच्या साहित्यातून घडते. साहित्यात त्यांनी मध्ययुगीन कालखंडातील तत्कालीन समाजव्यवस्थेचे यथार्थ व हुबेहूब वर्णन आपल्या 'अस्मानी सुलतानी' व परचक्रनिरुपन वगैरे स्पुटप्रकरणात देशस्थितीचे स्पष्ट वर्णन केलेले आहे.१४ एव्हढेच नव्हे तर मध्ययुगीण काळातील साधुसंतांच्या चमत्कारावर भाळणाज्यांच्या भोळसटपानावर त्यांनी टीका केली आहे.१५ आपल्या 'जन स्वभाव' गोसावी१६, हे प्रकरण (७० ओळी) उल्लेखनीय आहे. त्यात ते म्हणतात. जितके तितके ज्ञान झाले । उदंड गोसावी उतले । तयाचे संगती झाले बाष्कळ प्राणी ॥७॥ या चरानातून तत्कालीन समाजव्यवस्थेवर किंबहुना भोन्दुपानावर मार्मिक भाष्य केले आहे. 'मायाब्राम्हलक्षण' यासारख्या तात्विक विषयापासून बाग कशी करावी, इमारत कशी बांधावी, अक्षरे कशी घटवावी असल्या व्यवहारिक विषयांवर देखील त्यांनी लिखाण व भाष्य केले आहे.

मध्ययुगीन काळात समाजव्यवस्थेतील जनताही समाजाचा मोठा घटक आहे. तेव्हा तो सुशिक्षितांपेक्षा कमी अधिक प्रमाणावर अजान आहे. तेव्हा त्यांना हळूहळू शिकवून शहाणे करणे हे जाणत्याचे कर्तव्य आहे. अशी भूमिका रामदासांची होती. सामान्य जनतेतील सुप्त शक्तीची त्यांना जाणीव करून देवून ती राष्ट्रकार्यासाठी उभी केल्यास उत्तम संघटन होऊ शकते. याचे दृष्टत्व रामदासांना घडले असावे. सामान्य व्यक्तीचा स्वभाव, मानसशास्त्र, समाजशास्त्र व व्यापक राजकारण. इत्यादींचे यथार्थ ज्ञान असल्याने त्यांनी प्रत्यक्ष काळाला व सामान्यांना उद्देशून विवेचन व मार्गदर्शन केले. त्यांचे साहित्य आजही आधुनिक काळात मार्गदर्शक ठरेल असेच आहे. 'दासबोध' सारखा त्यांचा अतुल्य ग्रंथ आजच्या मानवी स्वभावावर व त्यांचा कर्तव्यपरायनतेवर अखंड प्रकाश टाकतो. आधुनिकिकरणाला नेहमी प्रेरणा ठरेल असाच आहे, कि जो मध्ययुगीन समाजरचना व आजच्या २१ व्या शतकाला नेहमी मार्गदर्शक ठरेल असाच आहे.



Scanned by CamScanner

संदर्भसूची :


१. शेणोलीकर ह. श्री. ; प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, फडके प्रकाशन, कोल्हापूर, चौथी आवृत्ती १९७१ पृ. क्र. ६९.

२. देसाई, लिमये ; प्राचीन पंथ, फडके बुकसेल्स कोल्हापूर, प्रथम आवृत्ती १९७६ पृ. क्र. १०२.

३. कित्ता ; पृ. क्र. ८८

४. कित्ता ; पृ. क्र. ९०

५. रामदासी मंदार (सं.पा.) ; श्रीशिवछत्रपती- समर्थयोग, श्री रामदास स्वामी संस्थान सज्जनगड. प्रथमावृत्ती श्री दासनवमी शके १९३५ पृ.क्र.१३८

६. कित्ता ;

७. समर्थ रामदास कृत ; 'अस्मानी सुलतानी'

८. श्रीमत दासबोध ; द.१८/ स.१८-१२

९. उपरोक्त रामदासी मंदार ; पृ. क्र. १५७

१०. उपरोक्त समर्थ रामदास ; अस्मानी

११. उपरोक्त शेणोलीकर ; पृ. क्र. १२७

१२. श्रीमत दासबोध ; द.२०/ स.१०

१३. उपरोक्त शेणोलीकर ; पृ. क्र. १३४

१४. कित्ता ; पृ. क्र. १२७

१५. कित्ता ;





Scanned by CamScanner